अर्थसंकल्पीय अनुदान २०१८-१९ मागणी क्र. वाय-०४, २७०२ लहान पाटबंधारे भूजल संपत्तीचे अन्वेषण व विकास आस्थापना (योजनेतर) २७०२३९१८

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-१६१८/प्र.क्र.१४०/पापु-१५

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल
क्रॉफर्ड मार्केटजवळ , लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय,मुंबई- ४०० ००१
तारीखः २४ एप्रिल,२०१८

वाचा -

शासन परिपत्रक,वित्त विभाग क्रमांकः अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३दिनांक ०२.०४.२०१८.

प्रस्तावना -

महाराष्ट्र विनियोजन विधेयक -२०१८ च्या अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमांस विधानमंडळाने मंजुरी दिली आहे. सदर विधेयकाचे अधिनियमात रुपांतर झाले असुन ते २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक -२२ म्हणून महाराष्ट्र राजपत्र असाधारण भाग ४, दि. २७ मार्च, २०१८ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले असल्याचे उपरोक्त परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे . वित्त विभागाच्या सदर परिपत्रकान्वये पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास महाराष्ट्र विनियोजन अधिनियम , २०१८ अनुसार वित्तीय वर्ष २०१८-१९ च्या एकुण अर्थसंकल्पीय योजनांतर्गत व योजनेतर तरतुदींपैकी ७० टक्के निधी सन २०१८-१९ च्या प्रथम नऊ महिन्यांकरिता (डिसेंबर २०१८ अखेर) अर्थसंकल्पीय प्रणालीवर उपलब्ध करुन दिला असल्याचे कळविले आहे.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या आस्थापनेचा खर्च भागविण्यासाठी "२७०२ लहान पाटबंधारे " या लेखाशिर्षाखाली रु. ३६६८.३५ लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे. वित्त विभागाच्या संदर्भाधीन परिपत्रकानुसार सदर लेखाशीर्षाखाली वितरीत

करण्यात आलेले अनुदान अर्थसंकल्पीय अनुदान संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांना उपलब्ध करुन देण्याची बाब विचाराधीन आहे.

शासन निर्णय-

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या आस्थापना व इतर अनुषंगीक बाबींवरील खर्च भागविण्यासाठी पुढील विवरणपत्रात स्तंभ-४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण रु. २५६७.८३६ लाख इतके भारित अनुदान संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांना या शासन निर्णयाव्दारे मंजूर व मुक्त करण्यात येत आहे.

अ.क्र	उपशीर्ष	सन २०१८-१९ करिता मंजूर तरतूद	वित्त विभागाने एप्रिल,२०१८ ते डिसेंबर,२०१८करिता उपलब्ध करुन दिलेले अर्थसंकल्पीय अनुदान
१	२	३	४
१	०१-वेतन	३४६१.५४	२४२३.०७
२	०३ -अतिकालीक भत्ता	६.०६	४.२४२
३	०६ -दुरध्वनी ,वीज देयके	३१.००	२१.७०
४	११- देशांतर्गत प्रवास खर्च	६५.९३	४६.१५
५	१३ -कार्यालयीन खर्च	३८.६९	२७.०८३
६	१४ -भाडे पट्टी व कर	४७.१६	३३.०१२
७	१७ -संगणकावरील खर्च	१.५३	१.०७१
८	२०- इतर प्रशासकीय खर्च	०.०१	०.००७
९	२४- पेट्रोल ,तेल, वंगण	४.७९	३.३५३
१०	५१ -मोटार वाहने	११.६४	८.१४८
	एकुण	**३६६८.३५**	**२५६७.८३६**

सदर खर्च मागणी क्र. वाय-४, लेखाशीर्ष "२७०२- लहान पाटबंधारे ,०२-भूजल ००५-अन्वेषण (०१) (०१) भूजल संपत्तीचे अन्वेषण व विकास आस्थापना (योजनेतर) २७०२ ३९१८ " या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात यावा. तसेच संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेल्या मासिक तरतूदीतून (Monthly Cash Flow)

भागविण्यात यावा सदर निधी वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि. ०२.०४.२०१८ च्या परिपत्रकातील तरतुदींच्या अधीन राहुन वितरीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२४११३९०३३२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chetan Balasaheb Nikam

Digitally signed by Chetan Balasaheb Nikam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, serialNumber=7268de40660971f80951c66d0e657e903b378196f51a978d2a366cf5eb564c0c, cn=Chetan Balasaheb Nikam
Date: 2018.04.24 13:25:16 +05'30'

(चेतन निकम)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
२. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सर्व
३. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सर्व
४. उप अभियंता (यां) , भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सर्व
५. महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई /२- नागपूर (लेखापरिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
६. वित्त विभाग, अर्थसंकल्प १६ (२ प्रती)
७. कक्ष अधिकारी / लेखा अधिकारी पापु-०४, पापु-२०
८. निवड नस्ती पापु-१५